क्र.२/नसवि/महासभा/ ०१ /२०१४-२०१५
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका.
दिनांक :- ०९ जून २०१४

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका सभा क्रमांक - ०१ /२०१४-२०१५

## महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------------------------------------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **गुरुवार दिनांक १९/०६/२०१४ रोजी दुपारी ०४.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

## परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.१५/०२/२०१४ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दुःखवठ्याचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात एकूण २० सुलभ शौचालये बांधलेली आहेत. पैकी ५ सुलभ शौचालये अंत्योदय कामगार परिषद यांना पे ॲन्ड युज या धर्तीवर देखभाल करणेसाठी दिलेली असून, ६ शौचालयाची देखभाल करणेची मुदत संपली असल्याने, एकूण १५ सुलभ शौचालये पे ॲन्ड युज या धर्तीवर देखभाल करणेसाठी ५ वर्षाच्या कालावधीसाठी महानगरपालिका टेंडर शर्तीअटीनुसार वार्षिक एजन्सी नियुक्त करणेस मान्यता मिळणेसाठी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१४/०२/२०१४ चे विषयपत्र.**

५. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी शौचालयाच्या मैला सक्शन करणेसाठी प्रति खेप र.रु.२००/- याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्राबाहेरील प्रति किलो मिटर र.रु.२०/- जाता येता अधिक रु.२००/- मात्र याप्रमाणे दर आकरणी करणेत येत आहे. सदरची सेवा महानगरपालिका ना-नफा,ना-तोटा या तत्वावर पुरवित आहे. तथापि, डिझेलच्या वाढलेल्या किंमती आणि कर्मचारी यांचे वेतन विचारात घेता महानगरपालिका हद्दीसाठी कमीत-कमी रु.५००/- प्रति खेप आणि महानगरपालिका हद्दीबाहेर प्रति किलो मीटर रु.२०/- जाता-येता. अधिक रु.५००/- प्रतिखेप याप्रमाणे आकारणी करणेस मान्यता मिळणेविषयी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.२९/०५/२०१४ चे विषयपत्र.**

६. महानगरपालिकेच्या सांगली शहरातील सि.स.नं.३४१ मधील १८४ गाळ्यामधील कोर्टमॅटर मधील तडजोड केलेल्या गाळे धारकांना गाळ्याचे वाटप करुन पुनर्वसन करणेबाबत मा.न्यायालयात तडजोड नामा केलेला आहे. त्यानुसार नऊ वर्षे कराराने गाळे ताब्यात न देता कायमस्वरुपी पुनर्वसन व्हावे अशी लाभार्थींची मागणी आहे. सदरची मागणी मान्य न झाल्यास गाळे ताब्यात घेण्यास लाभार्थी नकार देत आहेत. सद्यस्थितीत गाळे रिकामे राहिल्याने महापालिकेस उत्पन्नाला मुकावे लागत आहे. सबब, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९(क) अन्वये भाडेपट्टा कराराचा कालावधी ठरविणेसाठी धोरणात्मक मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१५/०२/२०१४ चे विषयपत्र.**

७. महानगरपालिकेच्या आमराई उद्यानांतील कवठ फळांच्या,चिंच फळांचा तसेच, आमराई उद्यान ते कॉलेज कॉर्नर पर्यंतच्या रस्त्यावरील व जुने वॉटर वर्क्स सांगली येथील चिंच फळांचा आणि रि.स.नं.९९/१ मधील गवतांचा जाहिर लिलाव करणेस मान्यता मिळाली होती. पैकी आमराई उद्यानांतील चिचं फळे आमराई ते कॉलेज कॉर्नर व जुने वॉटर वर्क्स येथील चिंच फळे आणि रि.स.नं. ९९/१ मधील गवतांचा जाहिर लिलाव करणेत आला असता, तीन लिलावामध्ये सर्वात जास्त बोली अनुक्रमे श्री.तौसिफ पठाण व श्री.सुरेश बाबूराव चौगुले यांची अनुक्रमे र.रु.१०,०००/- रु.६,१००/- आणि र.रु.३७,५००/- जास्तीची असल्याने, सदर तिन्ही लिलावास तीन वार अंतरावर अंतिम मान्यता मिळणेसाठी **उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.२५/०५/२०१४ चे विषयपत्र.**

८. महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालया मिरज कडील ग.नं.५९३/२ येथील एक एकर जमिनीमध्ये गवत (वैरण) लागवडीसाठी सन २०११-१२ ते २०१३-१४ या कालावधीसाठी त्रैवार्षिक जाहिर लिलाव करणेत आला होता. सदर जाहिर लिलावामध्ये एकूण ५ लिलाव धारकांनी भाग घेतला असता, सदर लिलावामध्ये श्री.सलीम अल्लाबक्ष मुल्ला यांची र.रु.६०,०००/- मात्रची सर्वात जास्त बोली असल्याने, त्यास तीनवार अंतरावर अंतिम मान्यता मिळणेविषयी **उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.२५/०५/२०१४ चे विषयपत्र.**

९. मिरज शहरातील रस्त्याच्या कडेला असणाऱ्या चिंच झाडाच्या चिंच फळांचा जाहिर लिलाव करणेस मान्यता मिळाली होती. त्यानुसार सदर लिलावामध्ये सर्वात जास्त बोली श्री.तौसिफ पठाण यांची र.रु.२५,१००/- **मात्रला तीनवार अंतरावर अंतिम मान्यता मिळणेसाठी उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.२५/०५/२०१४ चे विषयपत्र.**

१०. महानगरपालिकेच्या आमराई उद्यानातील जळाऊ लाकूड व धोकादायक झाडांच्या लिलावास महासभा ठराव क्र.२९३ दि.१५/०२/२०१४ अन्वये मान्याता मिळाली होती. त्यानुसार सदर जाहिर लिलावामध्ये तीस लिलावधारकांनी भाग घेतला होता. त्यामध्ये श्री.शरद शिवाजीराव पाटील यांची सर्वात जास्त बोली र.रु.१,२७,०००/- मात्रला तीनवार अंतरावर अंतीम मान्यता मिळणेसाठी **उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.३१/०५/२०१४ चे विषयपत्र.**

११. महापालिका क्षेत्रातील मोबाईल टॉवर्सना परवानगी देताना येणाऱ्या अडचणी विचारात घेवून मा.सह.संचालक नगररचना, पुणे विभाग पुणे यांनी शासन सूचना क्र.टीपीएस/१८१०/१९७५/ प्र.क्र./नविन६५/१२/वियो/नवि १३ दि.०३/१०/२०१३ चा संदर्भ देवून नविन विनियम अंर्तभूत करुन सूचना व हरकती मागविणेत आलेल्या आहेत. त्यानुसार महापालिका क्षेत्रातील मोबाईल टॉवर्सचे कंपनीचे प्रतिनिधी यांची बैठक आयोजित करणेत येवून, त्यामध्ये ०१ ते ०३ मुद्दयांचा समावेश करुन प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेबाबत **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१३/०२/२०१४ चे विषयपत्र.**

१२. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

१३. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत }

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

## सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१**

दिनांक :- १९/०६/२०१४

ठराव क्रमांक :- ०१

विषय क्रमांक :- ०१

---

मागील सर्वसाधारण महासभा दि.१५/०२/२०१४ चे कार्यवृत्तातील ठराव क्र.२६० ते ठराव क्र.२९९ हे सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०६/२०१४

ठराव क्रमांक :- ०२

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवटा ठराव

केंद्रीय ग्रामविकास मंत्री व महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्य मंत्री लोकनेते कै.गोपीनाथ मुंढे यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्‌गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

अनुमोदक :- मा.संजय नायकू मेंढे

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/- कांचन ऽ कांबळे
महापौर,

सही/- प्रशासकीय अधिकारी

**महापालिका सचिव,**
**सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका**

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०६/२०१४

ठराव क्रमांक :- ०३

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवटा ठराव

माजी आमदार तत्कालीन सांगली नगरपरिषदेचे माजी नगरसेवक सांगली जिल्ह्यातील राजकरणातील अभ्यासू व्यक्तीमत्व कै.व्यंकटेश नारायण पत्की तथा व्यंकप्पा पत्कीसर यांचे दि.१४ जून २०१४ रोजी दिर्घ आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्‌गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

अनुमोदक :- मा.संजय नायकू मेंढे

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही)
महापौर,

प्रशासकीय मान्य.

(सही)
**महापालिका सचिव,**
**सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.**

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१**

दिनांक :- १९/०६/२०१४

ठराव क्रमांक :- ०४

विषय क्रमांक :- ०२

## दुःखवटा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे माजी उपमहापौर व जेष्ठ नगरसेवक कै.दादासाहेब लांडगे यांचे दिर्घ आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या दुःखद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दुःखात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

अनुमोदक :- मा.संजय नायकू मेंढे

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ कांचन कांबळे
महापौर,

प्रशासकिय अधिकारी

**महापालिका सचिव,**
**सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.**

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०६/२०१४

ठराव क्रमांक :- ०५

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवठा ठराव

स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीचे माजी सभापती व जिल्ह्यातील जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी गांधीवादी विचारांचे मार्गदर्शक कै.धोंडीराम बापू माळी यांचे मंगळवार दि.१०/०६/२०१३ रोजी निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.संजय नायकू मेंढे

सौ.कांचन उ.कांबळे
महापौर,

प्रशासकीय माधि.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १९/०६/२०१४

ठराव क्रमांक :- ०६

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवठा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सन्मा.सदस्या सौ.आशा नितिन शिंदे यांच्या सासू सुमन कृष्णाजी शिंदे वय वर्षे ६८ यांचे दि.२८/०४/२०१४ रोजी अपघाती निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती देवो व सद्‌गती देवो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.पुष्पलता बाबासाहेब पाटील

अनुमोदक :- मा.प्रियांका सुरेश बंडगर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधि.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०६/२०१४

ठराव क्रमांक :- ०७

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवटा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील जेष्ठ पत्रकार कै.अनिल गणपती कांबळे यांचे ह्रदयविकाराने नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने महापालिका क्षेत्रातील एक जुने जाणते पत्रकार आपल्यातून निघून गेले आहे. पत्रकारितेमध्ये एक मोठी कधीही भरुन न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. महापालिका क्षेत्रातील विविध समस्यांचा अभ्यास असलेल्या पत्रकारास सांगली शहर मुकले आहे. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबावर दु:खाचे आभाळ कोसळले आहे. त्यांच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती देवो व सद्‌गती देवो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.दिग्विजय प्रदिप सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.विष्णू आण्णासाहेब माने

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय प्राधि.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०६/२०१४

ठराव क्रमांक :- ०८

विषय क्रमांक :- ०२

## दुःखवटा ठराव

सांगली जिल्ह्याचे नाव साता समुद्राच्या पलिकडे नेणारे कवलापूर गावचे थोर सुपूत्र व महाराष्ट्रातील अत्यंत लोकप्रिय तमाशा कलावंत कै.अंकुश संभाजी खाडे यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. कै.अंकुश संभाजी खाडे हे काळू बाळू तमाशातील लोकप्रिय कलावंत होते. त्यांनी अनेक सामाजिक मदतीसाठी विनामुल्य तमाशाचे कार्यक्रम करुन समाजाला आर्थिक मदत मिळवून दिली. त्यांच्या दुःखद निधनामुळे त्यांच्या कुटूंबियाच्या दुःखात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती देवो व सद्‌गती देवो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.जगन्नाथ बापू ठोकळे

अनुमोदक :- मा.अश्विनी हेमंत खंडागळे

ठराव सर्वानुमते मंजुर

कांचन उ. कांबळे
महापौर,

प्रशासकीय आधि.

**महापालिका सचिव,**
**सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.**

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०६/२०१४

ठराव क्रमांक :- ०९

विषय क्रमांक :- ०२

---

## दु:खवठा ठराव

मिरज येथील प्रसिद्ध उद्योजक कै.जयंत महाबळ यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबियाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती देवो व सद्‌गती देवो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.सुरेश देवाप्पा आवटी

अनुमोदक :- मा.शिवाजी बाबूराव दुर्वे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधि.

**महापालिका सचिव,**
**सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.**

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०६/२०१४

ठराव क्रमांक :- १०

विषय क्रमांक :- ०२

## दुःखवटा ठराव

चित्रपट सृष्टीतील सुप्रसिद्ध सिनेफोटोग्राफर बाबासाहेब बाबालाल वस्ताद उर्फ व्ही.बाबासाहेब यांचे दिर्घ आजाराने दि.०५/०४/२०१४ रोजी निधन झाले. श्री.व्ही.बाबासाहेब यांना गंगा-जमुना,आई मिलन की बेला, आन मिलो सजना, आशा,आपनापण,अर्पण,आस-पास व गोपी यासह अनेक मराठी चित्रपटाचे चित्रीकरण त्यांनी केलेले होते. त्यांनी सिनेमा चित्रीकरणाच्या क्षेत्रात नवनवीन संकल्पना आणि तंत्रज्ञानात क्रांतीकारक बदल विकसीत केले होते. त्यामुळे चित्रपट सृष्टीत विशेषतः चित्रीकरणाच्या क्षेत्रात त्यांनी एक वेगळे स्थान निर्माण केले. श्री.व्ही.बाबासाहेब यांचेमुळे मिरजेचे नाव बॉलीवूड मध्ये प्रसिद्ध झाले. मिरजेचे सुपूत्र असणारे व मिरजेचे नाव जगाच्या नकाशावर प्रकाशित करणारे श्री.व्ही.बाबासाहेब यांच्या निधनामुळे चित्रपट सृष्टीचे न भरुन येणारे नुकसान झालेले आहे. त्याच प्रमाणे मिरज शहराचे नुकसान झालेले आहे. त्यांच्या दुःखद निधनामुळे त्यांच्या कुटूंबियाच्या दुःखात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती देवो व सद्‌गती देवो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.अतहर इद्रिस नायकवडी

अनुमोदक :- मा.आयेशा इद्रिस नायकवडी

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही)
महापौर,

प्रशासकीय मान्यी.

(सही)
महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०६/२०१४

ठराव क्रमांक :- ११

विषय क्रमांक :- ०२

---

## दु:खवटा ठराव

मिरजेतील महिला बचतगटातील व सामाजिक कार्यकर्ते सैफुनिसा अब्दुलमजीद सय्यद यांचे अचानक हृदय विकाराच्या झटक्याने दि.२३/०४/२०१४ रोजी निधन झाले. श्रीमती सैफुनिसा अब्दुलमजीद सय्यद यांनी महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांच्या मध्ये रोजगार निर्मिती व्हावी म्हणून त्यांनी अहोरात्र प्रयत्न केले व त्यांच्या माध्यमातून शेकडो महिलांना हाताला काम मिळाले व त्यांच्या कुटूंबियांना बळकट करण्याचे काम त्यांनी केले होते. त्यांच्या निधनाने मिरजेतील महिला बचत गटात पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबियाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती देवो व सद्‌गती देवो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.अतहर इद्रिस नायकवडी

अनुमोदक :- मा.आयेशा इद्रिस नायकवडी

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय मंडि.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ — दिनांक :- १९/०६/२०१४

ठराव क्रमांक :- १२

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवठा ठराव

मिरजेतील वीरशैव लिंगायत समाजातील तरुण तडफदार कार्यकर्ते व श्री.बसवेश्वर गणेश उत्सव मंडळाचे अध्यक्ष महादेव बाबूराव मसुते यांचे हृदय विकाराच्या झटक्याने दि.२३/०४/२०१४ रोजी निधन झाले. श्री.महादेव मसुते यांनी समाजात उल्लेखनिय काम केले होते. समाजामध्ये शिक्षण प्रसाराच्या माध्यमातून त्यांनी गल्ली बोळात शिक्षणाचे महत्व व आपल्या पाल्यांना शिक्षणाकडे ओढ घ्यावी म्हणून पालकांना मार्गदर्शन करीत होते. त्यांच्या निधनाने मिरज शहरातील एक चांगला सामाजिक कार्यकर्ता हरपलेला आहे. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबियाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती देवो व सद्‌गती देवो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.अतहर इद्रिस नायकवडी

अनुमोदक :- मा.आयेशा इद्रिस नायकवडी

ठराव सर्वानुमते मंजुर

श्री कांचन कांबळे
महापौर,

प्रशासकीय आहे.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१**

दिनांक :- १९/०६/२०१४

ठराव क्रमांक :- १३

विषय क्रमांक :- ०२

## दुःखवटा ठराव

मिरजेतील सुप्रसिद्ध ज्येष्ठ तबलावादक व शास्त्रीय संगीताचे अभ्यासक श्री.इलाही दादासो कलावंत यांचे हृदय विकाराच्या झटक्याने दि.०५/०५/२०१४ रोजी निधन झाले. श्री.इलाही दादासो कलावंत हे आपल्या गुणी कलेने अखंड भारतात मिरजेचे नांवलौकीक केले होते. श्री.कलावंत यांनी शास्त्रीय संगीतामध्ये त्यांनी अनेक शिष्य निर्माण केले होते. त्यांचा शिष्यवर्ग मोठा होता. त्यांनी राष्ट्रीय कलाकारांसोबत अनेक कार्यक्रमात सहभाग घेतलेला आहे. त्यांच्या दुःखद निधनामुळे त्यांच्या कुटूंबियाच्या दुःखात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती देवो व सद्‌गती देवो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.अतहर इद्रिस नायकवडी

अनुमोदक :- मा.आयेशा इद्रिस नायकवडी

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही)
महापौर,

प्रशासकीय प्रति,

(सही)
महापालिका सचिव,
**सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.**

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १९/०६/२०१४

ठराव क्रमांक :- ९४

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवठा ठराव

मिरजेतील हजरत ख्वॉजा शमना मिरा दर्ग्याचे पुजारी व सामाजिक कार्यकर्ते रईस मुसाअली मुश्रीफ यांचे दि.२७/०५/२०१४ रोजी निधन झाले. श्री.रईस मुश्रीफ हे मिरजेतील हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असणारे हजारो लोकांचे श्रद्धास्थान हजरत ख्वॉजा शमना मीरा दर्ग्याचे पुजारी होते. त्यांनी समाजात अनेक तरुणांना आपल्या व्यवसायातून रोजगार निर्मिती करुन त्यांना समाजामध्ये चांगले स्थान निर्माण करुन देण्याचे काम त्यांनी केले होते. त्यांचे सामाजिक काम उल्लेखनिय होते. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबियाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती देवो व सद्‌गती देवो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.अतहर इद्रिस नायकवडी

अनुमोदक :- मा.आयेशा इद्रिस नायकवडी

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय बाबी.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०६/२०१४

ठराव क्रमांक :- १५

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवटा ठराव

सांगली नगरीतील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते कै.मुरलीधर मोतीचंद शहा यांचे आज दि.१९/०६/२०१४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबियाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती देवो व सद्गती देवो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.आशा नितीन शिंदे

अनुमोदक :- मा.पुष्पलता बाबासाहेब पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ कांचन कांबळे
महापौर,

प्रशासकीय अधि.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

## सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०६/२०१४
२३/०६/२०१४

ठराव क्रमांक :- १६

विषय क्रमांक :- ०२

# अभिनंदनाचा ठराव

सन २०१४ मध्ये झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीत मा.श्री.नरेंद्र मोदी यांच्या खंबीर नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (N.D.A.) नेत्र दिपक व अभूतपुर्वक यश मिळून स्पष्ट बहुमत प्राप्त झाल्याने, मा.श्री.नरेंद्र मोदी यांची भारताच्या पंतप्रधान पदी निवड झाल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा मा.श्री.नरेंद्र मोदी यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.शिवराज श्रीशैल बोळाज

अनुमोदक :- मा.अश्विनी हेमंत खंडागळे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधि.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०६/२०१४
२३/०६/२०१४

ठराव क्रमांक :- १८

विषय क्रमांक :- ०२

---

## अभिनंदनाचा ठराव

अखंड हिंदूस्थानचे पंतप्रधानपदी मा.नरेंद्रजी मोदी यांची निवड नुकतीच झाली तसेच भारतीय जनता पार्टीस प्रचंड प्रमाणात मिळालेल्या बहुमत व यश मिळालेबद्दल व पंतप्रधान पदी मा.नरेंद्र मोदी यांची निवड झालेबद्दल व सांगली लोकसभा मतदार संघातून मा.संजय काका पाटील यांची खासदार पदी निवड झाल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा मा.श्री.नरेंद्र मोदी आणि मा.सजंय काका पाटील यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.धनपाल तात्या खोत

अनुमोदक :- मा.सुलोचना धनपाल खोत

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय प्रति.

महापालिका सचिव,
**सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.**

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** | दिनांक :- १९/०६/२०१४<br>२३/०६/२०१४

ठराव क्रमांक :- ९८

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे ज्येष्ट नेते श्री.रामहरी रुपनरवर यांची महाराष्ट्राच्या विधान परिषदेवर आमदार म्हणून निवड झाल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा श्री.रामहरी रुपनरवर यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.सुरेश देवाप्पा आवटी

अनुमोदक :- मा.शिवाजी बाबूराव दुर्वे

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ. कांचन उ. कांबळे

महापौर,

## सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०६/२०१४
२३/०६/२०१४

ठराव क्रमांक :- १९

विषय क्रमांक :- ०२

# अभिनंदनाचा ठराव

महानगरपालिका मिरज विभागास मा.आयुक्त यांनी काही दिवसा पूर्वी भेट दिली असता, त्यांचेकडे मिरज येथील लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याचे सुशोभिकरण करणेचे निवेदन नागरिकांकडून देणेत आले असता, त्यांनी याची गांभियाने दखल घेत या पुतळ्याचे सुशोभिरणाची कामगिरी करणेस संबंधीतांना आदेश देताच या कामास लगेच सुरुवात करणेत आली. लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याचे सुशोभिरणाचे निवेदन या पूर्वी अधिकाऱ्यांना देवून सुद्धा आज तागायत याची कामगिरी झाली नाही पण, आपण केलेल्या या कामगिरी बद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा मा.आयुक्त अजिज कारचे यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.शेवंताताई गोपाळ वाघमारे

अनुमोदक :- मा.सुरेखा कल्लाप्पा कांबळे

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही)
महापौर,

प्रशासकीय आदेश.

(सही)
**महापालिका सचिव,**
**सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.**

## सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०६/२०१४
२३/०६/२०१४

ठराव क्रमांक :- २०

विषय क्रमांक :- ०२

---

## अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील माध्यमिक व उच्चमाध्यमिक शालांन्त परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनींचे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.संजय नायकू मेंढे

महापौर,

प्रशासकीय आधि.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०६/२०१४
२३/०६/२०१४

ठराव क्रमांक :- २१

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

कम्युनिस्ट नेते मा.आमदार जगन्नाथ आप्पा शिंदे यांची राज्यपाल पदी निवड झालेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा मा.आमदार जगन्नाथ आप्पा शिंदे यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.दिग्विजय प्रदिप सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.विष्णू आण्णासाहेब माने

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही)
महापौर,

प्रशासकीय आधि .

(सही)
महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

## सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०६/२०१४
२३/०६/२०१४

ठराव क्रमांक :- २२

विषय क्रमांक :- ०२

# अभिनंदनाचा ठराव

महानगरपालिका क्षेत्रातील न्यु रेल्वे स्टेशन तपकिरी मळा येथील झोपडपट्टीत राहणारा वैभव आप्पासाहेब हेगडे या विद्यार्थ्याने इयत्ता १० वी च्या परिक्षेमध्ये ८७% मार्क मिळविले त्यांची घरची परिस्थिती गरिबीची असतानाही आर्थिक परिस्थितीवर मात करीत वैभव यांने घवघवीत यश संपादन केलेबद्दल त्यांच्या उज्वल भविष्याकरीता सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा वैभव आप्पासाहेब हेगडे यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.जगन्नाथ बापू ठोकळे

अनुमोदक :- मा.अश्विनी हेमंत खंडागळे

ठराव सर्वानुमते मंजुर

कांचन कांबळे
महापौर,

प्रशासकीय आदि.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १९/०६/२०१४
२३/०६/२०१४

ठराव क्रमांक :- २३

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१४/०२/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने महानगरपालिका क्षेत्रात एकूण २० सुलभ शौचालये बांधलेली आहेत. पैकी ५ सुलभ शौचालये अंत्योदय कामगार परिषद यांना पे अँड युज् या धर्तीवर देखभालीचा खर्च म्हणून प्रत्येक कुटूंबास प्रतिमहा रु.२०/- व बाहेरुन येणाऱ्या नागरिकांनाकरीता रु.१/- प्रति व्यक्ती याप्रमाणे आकारणी करणेत येवून, देखभाल करीतआहेत. त्यांची मुदत सन २०१५ पर्यंत असून, उर्वरीत ६ सुलभ शौचालये सन २००६ ते सन २०११ या कालावधीकरीता देखभाल करणेसाठी अंत्योदय कामगार परिषद यांची नियुक्ती करणेत आली असून, त्यांची मुदत सन २०११ साली संपुष्टात आली आहे.

सुलभ शौचालयाची देखभाल करणेची मुदत संपलेले सहा आणि महानगरपालिकेने नव्याने बांधलेले ९ असे एकूण १५ सुलभ शौचालये पे अँड युज् धर्तीवर देखभाल करणेकरीता ५ वर्षे कालावधीसाठी एजन्सी महानगरपालिकेच्या शर्ती-अटीनुसार नियुक्त करणे आवश्यक आहे. यासाठी सदरचा प्रस्ताव निर्णयासाठी महासभेमध्ये ठेवणेत आला होता.

प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. महानगरपालिका क्षेत्रामध्ये बांधणेत आलेल्या काही सुलभ शौचालयांना पाणी कनेक्शन नाही. विज कनेक्शन नाहीत. त्यामुळे शौचालयांची दैनीय अवस्था झाली आहे. त्यामुळे लाईट/पाणी बिल कोणी भरावयाचे याचा शर्ती अटीमध्ये स्पष्ट समावेश करणेत यावा. सुलभ शौचालये पे अँड युज् धर्तीवर देखभाल करणेसाठी वार्षिक एजन्सी नियुक्त करणेसाठी सभेतील चर्चेनुसार नव्याने शर्ती व अटी तयार करणेसाठी ही सभा मा.आयुक्तसो यांना प्राधिकृत करीत असून, एकूण २० सुलभ शौचालये पे अँड युज् धर्तीवर ५ वर्षे कालावधीसाठी देखभाल करणेसाठी महापालिकेच्या शर्ती-अटीनुसार एजन्सी नियुक्त करणेसाठी रितसर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने मा.शेवंताताई गोपाळ वाघमारे यांनी दिलेली उपसूचना दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेने वॉर्ड क्र.१६ मधील स्वस्तीक वे ब्रिजच्या पाठीमागे संजय गांधी झोपडपट्टी सांगली येथे सुलभ शौचालय बांधलेले आहे. सदरचे सुलभ शौचालय देखभालीसाठी वार्षिक एजन्सी नियुक्ती करणेत आलेली होती. सदर एजन्सीने देखभालीची कामगिरी अर्धवट सोडून गेल्याने सदर भागातील नागरीकांची फारमोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून, शौचालयाची अवस्था दयनीय झाली आहे. तरी सदरचे सुलभ शौचालय वरील निर्णयानुसार देखभाल करणेसाठी वार्षिक एजन्सी नियुक्त करणेस ही सभा मान्यता देत आहे.

... २ ...

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने मा.हारुण अजीज शिकलगार यांनी दिलेली उपसूचना दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या सांगली येथील प्रभाग क्र.३५ मधील हिराबाग वॉटर वर्क्स पिछाडीस गेल्या ३०-३५ वर्षापूर्वीचे सार्वजनिक शौचालय बांधणेत आलेले आहे. सदरचे शौचालय पडीक झाले असून, ठिकठिकाणी विटा निघालेल्या असलेने धोकादायक बनले आहे. त्याच रस्तेवर महापालिकेने सुलभ शौचालय बांधले असून, सदर सुलभ शौचालयाचा नागरिक दैनंदिन वापर करतात. पडीक शौचालयाचा वापर नागरिक करीत नसून, तेथे मोकाट जनावरांचा अड्डा बनला असून, दुर्गंधी पसरलेली आहे. तरी सदर पडीक धोकादायक शौचालयाची समक्षात पहाणी करुन पाडणेची कार्यवाही ठेवणेत यावी त्यास ही सभा मान्यता देत आहे.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने मा.किशोर दादासो जामदार यांनी दिलेली उपसूचना दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय मिरज वॉर्ड क्र.२७ मधील किल्ला भाग येथे श्री.किशोर गोरे यांचे घराचे पिछाडीस पुरुष व स्त्रीयांचेसाठी सार्वजनिक शौचालय बांधणेत आलेले आहे. सदरचे शौचालय जूने व जीर्ण झाले असून, सदर शौचालयाचा वापर तेथील नागरीक करत नाहीत. महानगरपालिकेने जवळच सार्वजनिक शौचालय बांधले असून, सदरचे जीर्ण झालेले सार्वजनिक शौचालयाची समक्षात पहाणी करुन पाडणेकामी कार्यवाही ठेवणेत यावी त्यास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा.किशोर दा.जामदार — ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.रमेश नाईक

महापौर,

वैद्यकीय आरोग्याधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

**सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका**

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १९/०६/२०१४
२३/०६/२०१४

ठराव क्रमांक :- २४

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त [आरोग्यविभाग] यांचे दिनांक २९/०५/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले .

सांगली मिरज आणि कुपवाड शंहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी शौचालयाचा मैला सक्शन करणेसाठी प्रतिखेप रु २००/- आणि महापालिका क्षेत्राबाहेरील प्रति किलोमीटर रु २०/- [जाता येता ] अधिक रु २००/- याप्रमाणे दर निश्चित करुन त्यानुसार आजअखेरकार्यवाही ठेवली जात आहे. सदरची सेवा ही महानगरपालिका ना- नफा ना-तोटा या धर्तीवर पुरवित आहे सदर वाहनांवर कार्यरत असणा-या कर्मचा-यांचे वेतन आणि बाजारात वाढलेल्या डिझेलच्या किंमती ही बाब विचारात घेता सदरचे दर अत्यंत अल्प आहेत. यासाठी महापालिका क्षेत्रासाठी रु ५००/- याप्रमाणे आकारणी करणेस मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्यासी ही सभा सहमती दशवित असून महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी शौचालयाचा मैला सक्शन करणेसाठी रु ५००/- प्रतिखेप आणि महापालिका हददीबाहेरील प्रतिकिलोमीटर रु २०/- [जाता येता ] अधिक र. रु ५००/- या प्रमाणे दर आकारणी करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे. सदरची दरवाढ ही १ जुलै २०१४ पासून अमंलात आणणेसाठी प्रशासनाने कार्यवाही ठेवावी असे ही सभा आदेशीत करीत आहे.

सुचक मा. किशोर जामदार

अनुमोदक मा. राजेश नाईक

ठराव सर्वानुमते मंजूर

कांचन उ. कांबळे
महापौर

वैद्यकीय आरोग्याधिकारी
मंजूरीप्रमाणे कार्यवाही ठेवणेत यावी.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०६/२०१४
२३/०६/२०१४

ठराव क्रमांक :- २५

विषय क्रमांक :- ०६

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२९/०५/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महासभेने सांगली शहरातील खोकी धारकांचे पुनर्वसन करणेचे धोरण ठरविले आहे. त्यानुसार सांगली शहरातील जुने रेल्वे स्टेशन येथील खोकी काढतेवेळी काही खोकी धारकांनी मा.न्यायालयात दावा दाखल केला होता. सि.स.नं.२४१ मधील १८४ गाळ्यामधील दाव्यामध्ये तडजोड केलेल्या गाळेधारकांना प्रथम प्राधान्याने गाळे वाटप केले असून, उर्वरित गाळे धारकांना चिठ्ठ्या टाकून ड्रॉ पद्धतीने गाळे वाटप करणेत आलेले आहेत.

खोकी धारकांनी मा.न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यामध्ये तडजोडनामा केलेला असून, सदरचे गाळे नऊ वर्ष कराराने ताब्यात न देता कायमस्वरुपी पुनर्वसन करावे अशी लाभार्थीची मागणी आहे. सदरची मागणी मान्य न झालेस गाळे ताब्यात घेण्यास लाभार्थी नकार देत आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत गाळे रिकामे राहून महानगरपालिकेला उत्पन्नापासून मुकावे लागत आहे.

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९(क) अन्वये भाडे पट्टा कराराचा कालावधी ठरविण्यासाठी धोरणात्मक निर्णयासाठी विषयांकीत प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेने सांगली शहरातील खोकी धारकांचे पुनर्वसन करणेचे धोरण अवलंबिले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९(ब) नुसार मा.आयुक्त यांना स्थायी समितीच्या मंजूरीने महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्तेचे मुल्य ५०००/- हून अधिक नसेल अशी मालमत्ता एक वर्षाहून अधिक अशा कालावधीसाठी पट्टयाने देता येईल किंवा जिचे मुल्य ५०,०००/- हून अधिक नसेल अशी मालमत्ता कायमच्या पट्टयाने देता येईल. तसेच कलम ७९(क) आयुक्तास, महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर व जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल, विकता येईल भाड्याने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरीत करता येईल अशी स्पष्ट तरतुद आहे. त्यामुळे कायम स्वरुपी पुनर्वसन करणेची मागणीचा विचार करता येणार नाही तसेच, सदरचे गाळे हे महानगरपालिकेच्या मालकीचे रहावेत असे या सभेचे स्पष्ट मत आहे. सबब, महानगरपालिकेच्या सि.स.नं.३४१ मधील १८४ गाळे धारकांचे २९ वर्षे मुदतीसाठी दर तीन वर्षानी २०% भाडेवाढ आणि सदरचे गाळे वारसा हक्का शिवाय अन्य कोणत्याही व्यक्तीच्या नावे हस्तांतरण न करणेच्या अटीवर भाडे पट्टयाने देणेस ही सभा धोरणात्मक मान्यता देत आहे. तसेच, करारपत्र करुन घेवून गाळेधारकांना गाळ्याचा ताबा सत्वर देणेत यावा अशी ही सभा आदेशीत करीत आहे.

सूचक :- (सही) मा.प्रशांत पाटील — ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (सही) मा.संतोष पाटील — (सही) कांचन कांबळे, महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

(सही)
महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** | दिनांक :- १९/०६/२०१४ / २३/०६/२०१४

ठराव क्रमांक :- २६

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.२५/०५/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या आमराई उद्यानांतील कवठ फळांच्या,चिंच फळांचा तसेच, आमराई उद्यान ते कॉलेज कॉर्नर पर्यतच्या रस्त्यावरील व जुने वॉटर वर्क्स सांगली येथील चिंच फळांचा आणि रि.स.नं.९९/१ मधील गवतांचा जाहिर लिलाव करणेस मान्यता मिळाली होती. पैकी आमराई उद्यानांतील चिचं फळे आमराई ते कॉलेज कॉर्नर व जुने वॉटर वर्क्स येथील चिंच फळे आणि रि.स.नं. ९९/१ मधील गवतांचा जाहिर लिलाव करणेत आला असता, तीन लिलावामध्ये सर्वात जास्त बोली अनुक्रमे श्री.तौसिफ इस्माईल पठाण यांची अनुक्रमे र.रु.१०,०००/- रु.६,१००/- आणि श्री.सुरेश बाबूराव चौगुले यांची र.रु.३७,५००/- जास्तीची असल्याने, सदर तिन्ही लिलावास तीन वार अंतरावर विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- [signature] मा.किशा आमदार

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- [signature] मा.राजेश नाईक

[signature] कांचन उ. कांबळे
महापौर,

उद्यान आवेक्षक

[signature]
**महापालिका सचिव,**
**सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.**

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** | दिनांक :- १९/०६/२०१४, २३/०६/२०१४

ठराव क्रमांक :- २७

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.२५/०५/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालया मिरज कडील ग.नं.५९३/२ येथील एक एकर जमिनीमध्ये गवत (वैरण) लागवडीसाठी सन २०११-१२ ते २०१३-१४ या कालावधीसाठी त्रेवार्षिक जाहिर लिलाव करणेत आला होता. सदर जाहिर लिलावामध्ये एकुण ५ लिलाव धारकांनी भाग घेतला असता, सदर लिलावामध्ये श्री.सलीम अल्लाबक्ष मुल्ला यांची र.रु.६०,०००/- मात्रची सर्वात जास्त बोली असल्याने, त्यास तीनवार अंतरावर विषयपत्रातील शिफारशीनुसार अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- मा.किशा जामदार

अनुमोदक :- मा.राजेश नाईक

ठराव सर्वानुमते मंजुर

श्री.कांचन उ.कांबळे
महापौर,

उद्यान आवेक्षक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०६/२०१४  
२३/०६/२०१४

ठराव क्रमांक :- २८

विषय क्रमांक :- ०९

---

सोबतचे उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.२५/०५/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मिरज शहरातील रस्त्याच्या कडेला असणाऱ्या चिंच झाडाच्या चिंच फळांचा जाहिर लिलाव करणेस मान्यता मिळाली होती. त्यानुसार सदर लिलावामध्ये सहा लिलाव धारकांनी भाग घेताल होता. त्यामध्ये सर्वात जास्त बोली श्री.तौसिफ पठाण यांची र.रु.२५,१००/- मात्रला तीनवार अंतरावर विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- मा.किशोर जामदार

अनुमोदक :- मा.राजेश नाईक

ठराव सर्वानुमते मंजुर

श्री कांचन उ. कांबळे  
महापौर,

उद्यान अधिक्षक

महापालिका सचिव,  
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

## सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०६/२०१४
२३/०६/२०१४

ठराव क्रमांक :- २९

विषय क्रमांक :- १०

---

सोबतचे उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.३१/०५/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या आमराई उद्यानातील जळाऊ लाकूड व धोकादायक झाडांच्या लिलावास महासभा ठराव क्र.२९३ दि.१५/०२/२०१४ अन्वये मान्यता मिळाली होती. त्यानुसार सदर जाहिर लिलावामध्ये तीस लिलावधारकांनी भाग घेतला होता. त्यामध्ये श्री.शरद शिवाजीराव पाटील यांची सर्वात जास्त बोली र.रु.१,२७,०००/- मात्रला तीनवार अंतरावर विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतीम मान्यता देत आहे.

सूचक :- मा. रफिक दा. आमदार — ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. रजेश नाईक

महापौर,

उद्यान आवेक्षक

**महापालिका सचिव,**
**सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.**

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०६/२०१४
२३/०६/२०१४

ठराव क्रमांक :- ३०

विषय क्रमांक :- ११

---

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१३/०२/२०१४ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महाराष्ट्र राज्यातील मंजूर प्रादेशिक व योजना क्षेत्रातील मोबाईल टॉवरची उभारणी व अनुषंगिक बाबींसाठी टेलिकम्युनिकेशन संदर्भातील अडीअडचणी विचारात घेवून कम्युनिकेशन बेस स्टेशन सेल्युलर साईटस् आणि त्यासाठी आवश्यक असणारी साधनसामुग्री उभारणे कामी राज्यामध्ये एकसुत्रता असावी त्या दृष्टीने धोरण निश्चित केले असून, महाराष्ट्र शासनाने क्र.टीपीएस/१८१०/१८७५/प्र.क्र.नविन/६५/१२/वि.यो./नवि-१३ दि.०३/१०/२०१३ अन्वये नविन विनीमय अंतर्भुत करुन नोटीस प्रसिद्ध केली आहे. त्यास अनुसरुन प्राप्त हरकत /सूचना अर्जाबाबत नियोजन प्राधिकरण महानगरपालिकेचा अहवाल विहित मुदतीत पाठविणेबाबत सूचित केले आहे. त्यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील मोबाईल टॉवर्सना परवानगी देणेकामी मा.शासनाने सूचित केलेप्रमाणे १ ते १४ बाबींशिवाय खालील नविन तीन बाबींचा समावेश करुन तसा प्रस्ताव मा.शासनाकडे सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

१. ज्या इमारतीवर मोबाईल टॉवर्स बसविले आहेत त्या टॉवर्ससाठी दर ३ वर्षांनी इमारतीचे स्ट्रक्चर स्टॅबिलीटी सर्टीफिकेट घेणे आवश्यक आहे.
२. विद्यमान मोबाईल टॉवर्सना नियमानुकूल करुन घेण्यासाठी २ वर्षाऐवजी सहा महिने मुदत देणेत यावी.
३. इमारतीचा घरफाळा जमा केला नाही तर टॉवर यंत्रना सील करण्याचे अधिकार महापालिकेस राहतील.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये ज्या मोबाईल कंपन्यानी विनापरवाना मोबाईल टॉवर्स उभे केले आहेत आणि सदरचे टॉवर्स विहित मुदतीत नियमानुकूल न केल्यास अशा टॉवर्स कंपन्यांचेकडून रु.१० लाख इतका दंड आकारणेत यावा आणि ज्या मालमत्ता धारकांनी त्यांच्या मालकीच्या जागेत असे विनापरवाना टॉवर्स उभा करणेत आले आहेत अशा मालमत्ता धारकांचेवर फौजदारी स्वरुपाची कारवाई करणेत यावी त्यास ही सभा मान्यता देत आहे.

नगररचना/फा/२

सूचक :- मा.कि.दा.जमदार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

अनुमोदक :- मा.राजेश नाईक

महापौर,